ॐ

# अध्याय नववा

१ भक्त-जन-प्रिय जगदीश्वर तो वदे सदय यदु-राज
''निज-जीवींचें गूज सांगतों तुजसी अर्जुना, आज १

आस्था धरिसी अशी मानसीं निर्मत्सर तूं होसी
तरी तत्त्वतां गूज सांगतां कष्ट कायसे मजसी २

मूल तान्हुलें स्तनीं बिलगलें तरी तयातें माय
वात्सल्य-भरें पान्हुनी त्वरें स्तन्य न देई काय ? ३

असे अनिंदक जो शुद्ध-मति भजे हि सु-मनोभावें
अनन्य-गतिका तया गूढ हें सुखें चि उपदेशावें ४

अन्य न कोणी तुजवांचोनी प्रस्तुत गुण-संपन्न
ऐक भारता, कथितों आतां ज्ञान तसें विज्ञान. ५

राजहंस तो दुग्ध निवडितो जसें सांडुनी पाणी
तुज विभागणी करुनी देईं तशी ज्ञान-विज्ञानीं ६

प्रापंचिक तें भूस झाडुनी ज्ञान-कणांची रास
हातीं येतां पावशील तूं सहजें मोक्ष-पदास. ७

२ सकल हि विद्यांमध्ये विद्या आध्यात्मिक ही श्रेष्ठ
पावन सर्वोत्तम ज्ञान हें गुह्यांमाजि वरिष्ठ ८

गुरु-कृपा जरी तरी अंतरीं अप्रत्यक्षपणें प्रकटे
सनातन असें धर्म-सार हें सुखें साधका भेटे ९

भेटी पडतां न उरे ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान-त्रिपुटी
परं-धाम तें सुलभ्य होतें मद्भक्तांसि किरीटी ! १०

३ परी रुचे ना अश्रद्ध जना धर्म-सार हें ज्ञान
म्हणुनी मातें न पावती ते नास्तिक पुरुष अजाण ११

असतां जवळी दुग्ध आंचळीं गोड तरी गोचीड
अव्हेरुनि तें रक्त चि पिउनी काय न पुरवी कोड ? १२

भ्रांत नर तसा जगीं अंधसा वागे झांकुनि डोळे
ज्ञान-कमलिनी सन्निध असतां काम-कर्दमीं लोळे ! १३

म्हणुनि तयाला न कधीं चुकला जन्म-मरण-संसार
असतां उघडें तरी न उघडे आत्म-सुखाचें द्वार १४

४ असे संचलें आत्म-सुख भलें जगतीं अपरंपार
आत्म-रूपता ती अनुभवितां आत्म-मय चि संसार १५

असतां सोनें होउनि लेणें दिसतें नानाकार
एक अनामी तसा दिसें मी विश्वीं विश्वाकार ! १६

व्यापुनि राहें जगत् सकल हें मी असुनी अव्यक्त
मात्र बिंबतें भूत-मात्र तें मद्रूपीं निभ्रांत १७
नसे विकारीं मी अविकारी नाम-रूप-संबंध
मुळीं न मजसी परंतु माझा असे तया अनुबंध १८
जळीं चि होती बुडबुडे किती जळ नच जैसें त्यांत
माझ्या ठायीं सकल हि भूतें परि नच मी भूतांत १९
५ नच भूतें हि माझ्या ठायीं पहा ईश्वरी शक्ति
कर्ता धर्ता भर्ता असुनी न च राहें मी भूतीं ! २०
मी कर्ता मी धर्ता भूतां हे संकल्पीं बोल
शोभती भले परि ते सगळे निःसंकल्पीं फोल २१
मद्रूपासी जरी पाहसी सांडुनियां संकल्प
तरी अर्जुना, भेद-भावना गळेल आपोआप २२
अखंड माझ्या निर्मळ रूपीं जो भूतोद्भव कल्पी
असे हि भूताभास तयासी तयाच्या चि संकल्पीं २३
रज्जू असतां सर्प चि भासे सांजेच्या समयास
तसा स्व-रूपीं संकल्पास्तव होतो भूताभास २४
एक चि माती असतां होती नाना घट निर्माण
कुंभकार-मति कारण होते तिथे सर्वथा जाण २५
तैसी असतां माझी सत्ता गमती नाना भूतें
भेद अभेदीं दिसावयातें प्रकृती कारण होते २६

ती चि कल्पिती प्रकृति लोपतां होतां आत्म-ज्ञान
देखसील तूं सकल हि भूतें मद्रूपीं चि अभिन्न २७
'न च मी भूतीं' 'भूतें न च तीं मजमाजीं' ही खूण
साधीं, माझें भूतांपासुनि अभिन्नत्व लक्षून ! २८
६ सर्वत्र महा-वायु सर्वदा आकाशीं तो राहे
तशीं सकल तीं भूतें असती माझ्याठायीं पाहें २९
जरि हालविला तरी वेगळा भासे गगनाहून
तो चि नातरी संतत राहे गगन-रूप होऊन ३०
तैसीं भूतें कल्पिलीं तरी भासती चि मद्रूपीं
परी सर्वथा मी चि होउनी असती निःसंकल्पीं ३१
अखंड निर्मळ मद्रूपाचा होतां साक्षात्कार
देखसील तूं मग चराचरीं आत्म-रूप साचार ३२
ह्यास्तव येथें कथितों तूतें आत्म-ज्ञान-सुवर्म
जेणें माया-भ्रम सांडुनियां पावशील तूं ब्रह्म ३३
७ विलीन होतें अव्यक्तीं तें भूत-मात्र कल्पान्तीं
कल्पारंभीं पुन्हां तें चि मी सृजितों ऐसी ख्याती ३४
८ धरुनी हातीं निज-प्रकृति मी निर्मीं वारंवार
भूत-संघ हा प्रकृति-वश पहा तया ती चि आधार ३५
अगा नगर हें रचिलें रायें ऐसें सर्व हि म्हणती
खरें पाहतां काय तयाचे हात-पाय ते शिणती ? ३६

स्थावर अथवा जंगम जें जें असे सूक्ष्म वा स्थूळ
ओळख सारें भूत-जात तें केवळ माया-मूळ ३७

म्हणुनी पार्था, जाण सर्वथा करविता न मी कर्ता
असें तत्त्वतां अलिप्त परता कर्में करुनि अकर्ता. ३८

९ निज-प्रकृतिचीं कर्में न च तीं बांधूं शकती मातें
उदासीनवत् असें सर्वथा अनासक्त मी तेथें ३९

१० मज अधिष्ठुनी प्रकृति-तत्त्व तें चराचरातें रचितें
म्हणुनि अर्जुना, ही सृष्टीची घडामोड संभवते ४०

दीपाधारें करिती सारे जसे गृह-व्यापार
मत्साक्षित्वें तसे चि होती भूतांचे व्यवहार ४१

साक्षित्व हि तें तरि न राहतें सामरस्य अनुभवितां
भू-भिन्नता नसे तत्त्वतां सर्वत्र चि मी असतां ४२

सर्वां भूतीं माझी व्याप्ती असा ईश्वरी योग
नित्य जाणुनी अंतःकरणीं निर्विकल्प सुख भोग. ४३

११ जे मूढ-मती मज न देखती भूत-महेश्वर ऐसा
नच परमात्मा मनाव-धर्मा जे गणिती प्राकृतसा ४४

असें विदेही म्हणती देही अक्रियासि मज कर्म
आणि अजन्मा जन्म कल्पिती तसें अनामा नाम ४५

मज सहजाची स्वयंभवाची प्रतिष्ठापना करिती
त्रिगुणातीता सगुण, अनार्ता मज हि भाविती आर्ती ४६

निरंतराचें आवाहन तें तसें विसर्जन जाण
माझें करिती आणिक देती मज सर्वगता स्थान ४७

मज अव्यक्ता व्यक्त मानिती अशी अवज्ञा करिती
धरुनि मीपणा जगत्कारणा न जाणती जे जगतीं ४८

१२ आणि आसुरी संपत्तीचा आश्रय करुनी चित्तीं
अविवेकाचे धनी होउनी मोहीं गुंतुनि जाती ४९

जाण तयांचे वृथा ज्ञान तें कर्में हि वृथा जाण
तसे चि आशावाद तयांचे वृथा सर्वथा मान ! ५०

१३ परी जयांनीं जोड जोडुनी दैवी संपत्तीची
जगीं जागती ज्योत उजळिली भली धर्म-नीतीची ५१

ज्ञानें न्हाले पावन झाले नित्य निरंतर शांत
जे आत्म-सुखें सदा मातले असे महात्मे संत ५२

पूर्ण जाणुनी जगत्कारणा सनातनातें येथें
तन्मय-चित्तें मी चि होउनी भजती मातें ज्ञाते ५३

१४ मद्गुण गाती नित्य रंगती मुखें गर्जती नाम
सुखें साधिती सहज-जपातें स्मरुनी आत्माराम ५४

पुन्हां डोलती पुन्हां बोलती राम कृष्ण गोविंद
भक्ति-प्रेमें किती नाचती घेती एक चि छंद ५५

कीर्तन-रंगीं अशी लागतां ब्रह्मानंदीं टाळी
तृषा संपली भूक भागली कोण देह सांभाळी ! ५६

आणिक कोणी मन आवरुनी योग-साधना करिती
यम-नियमादि व्रतें पाळुनी वज्रासन ते रचिती ५७

प्राणायामें कुंडलिनीतें जागृत करुनी जाण
प्रत्याहारें धारणा-बळें अखंड धरुनी ध्यान ५८

पिंडें पिंडा ग्रासुनि नेती ब्रह्मांडातें प्राण
अशी समाधी साधुनि होती पर-तत्त्वीं रममाण ! ५९

आणि पांडवा, करिती सेवा कोणी वंदन करुनी
त्यजुनि अहंता एक चि जगतीं आत्म-रूप अनुभवुनी ६०

न देखती ते उच्चनीचते जगीं मी चि लक्षून
सर्वां भूतीं विनम्र होती मजमाजीं मिसळून ६१

१५ मज उपासिती अन्य हि कोणी ज्ञान-यज्ञ आचरुनी
माया-जनित भ्रांति जाळुनी 'ब्रह्माहं' मंत्रांनीं ६२

ब्रह्मानुभवीं सकल हि विश्वीं एक तत्त्व अनुभविती
समरस होती ऐसी करिती 'एकत्वें' मद्भक्ति ६३

आणिक हि दुजे जरी देखती जगतीं विविधाकार
तरी जाणती पृथगाकारीं आत्मा सकलाधार ६४

असे 'पृथक्त्वें' कोणी दुसरे 'बहु प्रकारें' भजती
सर्व-व्यापी मज भगवंता सर्वां भूतीं बघती. ६५

१६ यज्ञ-विधान हि मी यज्ञ हि मी वनस्पती यज्ञाची
अन्न अर्पिती यज्ञ-द्वारा पितरां तेंही मी चि ६६

तसा घृतादिक हविर्भाग मी यज्ञीं मंत्र विधान
तें हि सकल मी तेविं अग्नि मी आहुती हि मी जाण ६७

१७ माय बाप मी जगा वडिल मी मी चि तया आधार
असें पवित्र ब्रह्म ऋग्यजुः साम आणि ॐकार ६८

१८ ती परमगती मी चि भारता, भूतां पोषण-कर्ता
मी चि जगाचा धनी सर्वथा चाले माझी सत्ता ६९

आणि जगत्-व्यवहार सकल हा मी साक्षित्वें पाहें
अखिल जगाचें मी चि निवास-स्थान होउनी राहें ७०

शरणागत जे तयांसि सहजें मी चि आसरा जाण
मी सर्वांचा सखा जगाचें प्रभव-प्रलय-स्थान ७१

तेविं भारता, असें तत्त्वतां मी निधान जगतासी
नाम-रूप तें जिथे लोपतें तें बीज हि अविनाशी ७२

१९ सविता-रूपें मी चि तापतों मी चि शोषितों जल तें
इंद्र होउनी तसा पाडितों पुनरपि पर्जन्यातें ७३

मिथ्या जग तें मी चि सत्य जो आत्मा तोही मीच
मृत्यु-रूप मी अमर तें हि मी जगीं दुजें नाहींच ! ७४

सर्वात्मक मी सर्व हि तो मी सर्वातीत हि जाण
स्वतः सिद्ध मी 'असें नसें' हे दोन्ही भाव गिळून !! ७५

सर्वगत असा असतां मातें नेणती चि अज्ञानी
सहज-सुखातें सांडुनि झटती विषयसुखालागोनी ७६

गरुड आंधळा तरी तयाला पंख काय असुनी ते
आत्म-ज्ञानाविना तेविं तें सत्कर्म वृथा होतें ! ७७

२० वेदाभ्यसनीं निपुण होउनी याज्ञिक-वर जे कोणी
सकाम-चित्तें यजिती मातें विविध यज्ञ आचरुनी ७८

विधि हि जाणती पुनीत होती पिउनी सोम-रसातें
यज्ञ-देवता तुष्ट करुनियां पुण्य जोडिती निरुतें ७९

मज न जाणती इच्छा धरिती स्वर्ग-सुखाची चित्तीं
सुखें पावती पुण्य-बळें ते इंद्र-लोक-संपत्ति ८०

आणि भोगिती ते देहान्तीं दिव्य देव-भोगांतें
पुण्य स्वर्गीं अमृत-रसाचे झरे वाहती जेथें ८१

२१ परंतु पदरीं असे शिदोरी जोंवरि त्या पुण्याची
तोंवरी चि ती भोग-माधुरी भव्य स्वर्लोकींची ८२

पुण्य संपतां प्रवेश करिती पुन्हां मृत्यु-लोकांत
मज न जाणतां असे गुंतले जे तिन्ही वेदांत ८३

'पुनरपि जननं पुनरपि मरणम्' भव-चक्र असें फिरतें
तयां न चुकतें आणि जिणें तें लाजिरवाणें होतें ८४

मनीं कामना म्हणुनि तयांना दुःख भोगणें प्राप्त
अनात्मज्ञ ते शाश्वत सुख तें न पावती निभ्रांत ८५

असो 'सुकृत' तें परि ना देतें जें करुनी मत्प्राप्ति
पार्था, ज्ञाते तयासि निरुतें 'पाप' चि ऐसें गणिती ! ८६

जाण अर्जुना, म्हणुनि मजविना पावणें हि जो स्वर्ग
अज्ञ-जनांचा पुण्य-मार्ग तो जाणत्यांसि उपसर्ग. ८७

२२ नित्य अंतरीं चिंतन करुनी उपासिती जे भक्त
अनन्य-भावें अखंड मातें होउनियां संयुक्त ८८

निज-सायुज्या नेउनी तयां अथवा भक्ति-प्रेम
देउनी असा मी चि तयांचा वाहें योग-क्षेम ! ८९

२३ अग्नींद्रादिक अन्य देवता-प्रीत्यर्थ हि जे कोणी
यजिती श्रद्धाशील होउनी जनीं भक्त अज्ञानी ९०

पावे साचें यजन तयांचें तें हि मज चि परि जाण
विधान चुकती म्हणुनि पावती न च ते मज अज्ञान ९१

सेनाधिपतीविना विफल ती हालचाल सैन्याची
तेंवि निर्मळ ज्ञानाविण ती विफल गती कर्माची ९२

२४ मी फल-दाता आणिक भोक्ता असें सर्व यज्ञांचा
तत्त्व नेणती म्हणुनी धरिती पंथ अधःपतनाचा ९३

पितरोद्देशें अर्पिती जसें गंगोदक गंगेतें
अन्य-देवता-भावें तैसें देती माझें मज तें ९४

२५ देव-देवता-गण उपासितां देवत्वातें येती
भजती पितरां होय त्या नरां पितृ-लोक-संप्राप्ति ९५

भूत-प्रेतादिकांसि भजतां जाती त्या त्या लोकीं
मातें भजती ते नर होती मद्रूप चि अवलोकीं ९६

मत्प्राप्तिस्तव तयां करावा न लगे देह-त्याग
सुखें भोगिती जीवन्मुक्ती जे मद्भक्त विराग. ९७

२६ मज भक्तीनें अर्पी पानें फुलें फल हि वा जल तें
प्रेमळ भक्तें जें दिधलें तें सुखें सेवितों भलतें ९८

न च फळें फुलें तयें अर्पिलें मज सुर-तरु-उद्यान
जल ना शय्या-स्थान निर्मिलें तें क्षीराब्धिसमान ९९

पत्र पुष्प फल जल मिष केवल भजावयास्तव जाण
भाव-भक्तिचा मात्र भुकेला असें चि मी भगवान ! १००

२७ जें जें करिसी भोग भोगिसी जे जे देह-मनानें
सुख-संतोषें पात्र-विशेषीं जीं जीं देसी दानें १०१

व्रतें पाळिसी यज्ञीं करिसी होम-हवनही जें जें
तप आचरिसी तें तें पार्था, करीं मदर्पण सहजें १०२

२८ असें अर्पितां जें स्वभावतां घडेल तुज हातून
सुटशील तरी शुभाशुभ अशा कर्म-बंधनांतून १०३

विमुक्त होतां संन्यास तसा योग हि तुज साधेल
आणि सर्वथा सायासाविण मत्प्राप्ती लाधेल १०४

२९ सर्व प्राणी समान मानीं प्रियाप्रिय न मज कांहीं
मद्भक्त परी माझ्या ठायीं मी हि तयांच्या हृदयीं १०५

परिमळ पवनापाठीं देठीं फूल ज्यापरी बासें
मन मद्रूपीं जडतां उरलें देह तयाचें तैसें १०६

तन्मय झाला भेद राहिला न च त्याच्या-माझ्यांत
असे म्हणुनि तो माझ्या हृदयीं मी त्याच्या हृदयांत १०७

३० असो दुर्गुणी दुष्कृतखाणी महा-दुराचरणी तो
अनन्य-भावें मातें भजतां मुक्त सर्वथा होतो ! १०८

जरि तो पापी तरि अनुतापी होउनि आपोआप
मद्भक्ति-पथा अनुसरतां तो होतो मग निष्पाप १०९

दुर्जन आधीं परंतु बुद्धी झाली श्रद्धा-युक्त
तरी सद्गुणी साधु म्हणोनी मानावा तो मुक्त ११०

शास्त्रें शिकला सकल हि केला योगाभ्यास तयानें
तप आचरिलें सर्व साधिलें सहजें मद्भक्तीनें १११

३१ शीघ्र चि होतो धर्मात्मा तो मिळवी शाश्वत शांति
मद्भक्ताचा नाश न होतो धनंजया, कल्पान्तीं ! ११२

३२ स्त्री-शूद्र-वणिक् कीं पश्वादिक पाप-योनि जे होती
मातें भजतां तेहि सर्वथा मोक्ष-पदातें जाती ११३

नक्रें धरिला गजेंद्र आला शरण जेधवां मातें
संकटांतुनी तया तारुनी नेलें परम गतीतें ११४

काय तयाचा देह पशूचा आला मोक्षाआड ?
तरे मूढ हि माझ्या ठायीं ठेवुनि निष्ठा गाढ ! ११५

दृष्टी भोगी स्वरूप माझें वाचे मद्गुण-गान
धरुनी प्रीति मद्गुण-कीर्ति-श्रवणिं गुंतले कान ११६

मन हि जयांचें रतलें साचें मत्संकल्पीं नित्य
जें मद्भजनीं भूषण मानी त्यजुनी विषय अनित्य ११७
जाण अर्जुना, ज्ञान जयांचें मज एकातें जाणे
मदर्थ जगले ऐसे विकले जे मज जीवें प्राणें ११८
असोत भोळे भक्त ते भले नसोत ते व्युत्पन्न
वर्णोत्तम वा सुरूप अथवा ते श्रेष्ठ-कुलोत्पन्न ११९
परी सर्वथा तुलना करितां मजसी न च ते गौण
जे मत्प्रेमी ते आणिक मी एक-रूप संपूर्ण ! १२०
काम-संभ्रमें अथवा प्रेमें भयें तसें विद्वेषें
मन प्रवेशे जरि मद्रूपीं पार्था, कवणें हि मिषें १२१
तरी स्वभावें तेणें व्हावें मद्रूप चि तूं जाण
म्हणुनि अर्जुना, भक्ति-साधना नाहीं येथें वाण ! १२२
वहाळ वोहळ नदी नद असे दिसती भेद अमूप
गंगे मिळतां तीं स्वभावतां होती गंगा-रूप १२३
खैर-चंदनादिक ते नाना भेद तोंवरी काष्ठीं
एक-रूप तीं सर्व हि होती शिरतां अग्नि-प्रान्तीं १२४
स्त्री-शूद्र-वणिक्-पश्वादिक ह्या तंव चि वेगळ्या जाती
करुनी भक्ती जंव न पावती मज एकातें जगतीं १२५
३३ तरी पुण्य जे ब्राह्मण सहजें राजर्षि यशोधवल
मातें भजतां मला पावती ह्यांत कायसें नवल ? १२६

आणि अर्जुना, प्रपंच-रचना क्षण-भंगुर ही सारी
जन्मलासि तूं इथे अवचटें ह्या दुःखद संसारीं १२७

तरी त्यांतुनी अंग झाडुनी होई मोकळा वेगें
भाव धरुनियां नित्य सुख-द ह्या मद्भक्ति-पथा लागें १२८

३४ मन मद्रूपीं ठेवुनि अर्पि सकल हि कर्में मजसी
सर्वतोपरी धरीं अंतरीं मद्भक्ति-प्रेमासी १२९

सर्व-व्यापी सदा स्वरूपीं ठेवुनि अनुसंधान
मनःकल्पना जाळुनि नाना करीं असें मद्-यजन १३०

वंदन भावें तसें करावें मजसी सर्वां ठायीं
अभेद-चित्तें मज एकातें जाणुनि सर्वां देहीं १३१

जीवात्म्याचा परमात्म्याशीं साधुनियां संयोग
असा चि मत्पर तूं हि निरंतर मत्प्राप्ति-सुखा भोग !'' १३२

येथें भावार्थ गीतेचा नवमाध्याय संपला ।
राजविद्या-राजगुह्य-योग ह्यांत निवेदिला ॥ ९ ॥